Rajdhani
DATE / /

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संचालकसो,
महात्मा ज्योतिराव फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर.

विषय- निबंध स्वलिखित असलेबाबत.

महोदय,
मी श्री. पद्मराजे विद्यालय, शिरोळ ची विद्यार्थिनी कु. शिवानी सुधीर भंडारी इयत्ता दहावीत शिकत आहे. प्रस्तुत निबंधलेखन स्वलिखित केलेले असून त्याचा स्वीकार व्हावा ही नम्र विनंती.

कळावे,

आपली विश्वासू,
[signature]
कु. शिवानी सुधीर भंडारी.

नाव: कु. शिवानी सुधीर भंडारी.
पत्ता: शिवाजीनगर शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.
ई-मेल आयडी: sunekabhandari@gmail.com
संपर्क क्रमांक: 7071265268

Rajdhani
DATE / /

# भारतीय संविधानाचे महत्त्व

"दलितांचे ते तलवार होऊन गेले,
अन्यायाविरुद्ध प्रहार होऊन गेले,
होते एक ते गरीबच पण या जगाचा कोहिनूर होऊन गेले,
जग खूप रडवीत होता त्यांना पण ते या जगाला घडवून गेले,
अरे या मुर्खांना अजून कळत कसं नाही,
वर्गाच्या बाहेर बसून सुद्धा त्यांनी या 'भारताचे संविधान' लिहून गेले!"

ज्या डॉ. बाबासाहेबांना या देशात शिकण्यासाठी पुस्तक दिले जात नव्हते, त्याच बाबासाहेबांनी एक असे पुस्तक लिहिले की त्याच पुस्तकावर आज हा भारत देश चालतो..... ते म्हणजे 'भारतीय संविधान!' भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान म्हणून ओळखले जाते. संविधान म्हणजे देशाच्या राज्यकारभारासंबंधीच्या तरतुदींचा लिखित दस्तऐवज होय.

भारताच्या संविधान निर्मितीला इ.स. 1946 पासून सुरुवात झाली. 'स्वतंत्र भारताचा राज्यकारभार ब्रिटिशांनी तयार केलेल्या कायद्यानुसार चालणार नाही तर तो भारतीयांनी स्वतः तयार केलेल्या कायद्यानुसार चालेल' असा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचा आग्रह होता. त्यानुसार भारताचे संविधान तयार करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. ती समिती म्हणजे 'संविधान सभा' होय. या सभेत एकूण २९९ सदस्य होते. 'डॉ. राजेंद्रप्रसाद' हे संविधान सभेचे अध्यक्ष होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी अहोरात्र अभ्यास व चिंतन करुन संविधानाचा मसुदा तयार केला. भारताच्या संविधान निर्मितीतील योगदानामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' असे संबोधले जाते. डॉ. बाबासाहेबांनी तयार केलेला संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्यात आला. अनेक बैठकांनंतर अंतिम मसुदा 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेद्वारे स्वीकारला गेला. म्हणून 26 नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. 26 जानेवारी 1950 पासून संविधानातील तरतुदीनुसार देशाचा राज्यकारभार चालवण्यास सुरुवात झाली. या दिवसापासूनच भारताचे 'प्रजासत्ताक राज्य' अस्तित्वात आले. संविधान निर्मितीतील बाबासाहेबांच्या योगदानाविषयी मला

Rajdhani
DATE / /

लिहावेसे वाटते की,

"घटना अशी लिहिली की,
सूर्य चंद्र असेपर्यंत मिटणार नाही,
ऋण बाबासाहेबांचे या जन्मांत फिटणार नाहीत!"

सुरुवातीला एकूण 389 सदस्यांपैकी फाळणीनंतर 299 सदस्यांनी 1082 दिवसांत म्हणजे 2 वर्षे, 11 महिने आणि 18 दिवसांत जवळपास 12,000 पानांचे महान असे 'भारतीय संविधान' लिहिले. भारतीय संविधानात एकूण 1 प्रास्ताविका, 8 अनुसुची, 25 भाग आणि 395 कलमे होती. सध्या भारतीय घटनेत 1 प्रास्ताविका, 12 अनुसुची, 25 भाग, 448 कलमे आणि 5 परिशिष्टे आहेत. संविधान म्हणजे प्रत्येक भारतीयाचा जणू धर्मग्रंथ!

भारतीय संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्क, अधिकार, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यांची दिशा ठरविणारा ऐतिहासिक ग्रंथ आहे. संविधानाने सर्व जाती, धर्म, पंथांना एकत्र गुंफले आहे. संविधानामुळेच देश चालतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांची जोपासना संविधानानेच केली आहे. संविधानामुळे मिळालेल्या अधिकारांची जाणीव प्रत्येक नागरिकाला व्हावी, याकरिता शालेय अभ्यासक्रमामध्ये सुद्धा 'संविधानाचे महत्त्व' या विषयाचा समावेश केला जातो. देशात विविधता असतानाही प्रत्येकाला स्वाभिमानाचे हक्क संविधानानेच प्रदान केले आहेत. म्हणूनच मला लिहावेसे वाटते की,

"आदर्शवादी संविधान हे,
महान स्वतंत्र भारताचे,
जगी महान विस्ताराने,
लाभले प्रज्ञासुर्याच्या ज्ञानाने!"

आपले संविधान हे लोकशाही तत्त्वावर चालणारे आहे. म्हणजे काय? तर लोकशासन. "Democracy is the government of the people by the people and for the people." म्हणजेच लोकशाहीमध्ये शासन हे लोकांचे आहे आणि लोकांनी चालविलेले व लोकांसाठीचे शासन होय. आज संपूर्ण जगामध्ये भारतीय राज्यघटनेचा सन्मान केला जातो. का नाही करणार? विविध जाती, धर्म, वंश, रुढी, परंपरांनी नटलेला आपला

भारत देश डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळेच एकसंध उभा आहे. मानवाची मूल्य जपणारे, त्यांना स्वातंत्र्य बहाल करणारे, त्यांची रक्षा करणारे, 'स्त्री असो किंवा पुरुष सर्वजण समान..' या समानतेचा अवलंब करणारे, एकमेकांशी बंधुभावाने वागायला शिकवणारे आणि प्रत्येक जातीचा, धर्माचा आणि वर्गाचा आदर करणारे संविधान खरोखरच श्रेष्ठ आहे, याची आपल्याला जाणीव होते. याच संविधानामुळे आपला देश प्रगतिपथावर आहे, यात काडीमात्रही शंका नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, "संविधान हे एक महत्त्वपूर्ण दस्ताऐवज असून ते राज्याची तिन्ही अंगे म्हणजेच कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांची स्थिती व शक्ती स्पष्ट करते. त्यांच्या अधिकारांची सीमा निश्चित करुन त्यावर नियंत्रण ठेवीत असते व व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करीत असते." आपल्या संविधानाला बारकाईने जाणून घेतले; तर ते एक उत्तम मार्गदर्शक आणि एक अद्भुत प्रवर्तक असल्याचे प्रत्ययाला येईल. म्हणून मला नमूद करावेसे वाटते की,

"संविधान को पढ़कर,
मानवता को जाने,
अधिकारों के साथ जुडे,
कर्तव्यों को पहचानो"

'भारतीय संविधान' हा देशाचा सर्वश्रेष्ठ कायदा असून त्याबद्दल भारतीय जनतेच्या मनात पावित्र्य भावना असलेली दिसून येते. भारताच्या पुढेमागे स्वतंत्र झालेल्या दक्षिण आशियातील अन्य विविध देशांतील संविधाने ही सतत गडगडत असताना 'भारतीय संविधान' हे आजपर्यंत टिकून आहे. काळानुसार बदलण्याची लवचिकता अंगी असल्याने आजपर्यंत भारतीय संविधानात ७७ घटनादुरुस्त्या होऊनही आज भारतीय संविधानाची मूळ चौकट ही अबाधितच राहिलेली दिसून येते. याचे श्रेय संविधानकारांच्या दूरदृष्टीला आणि त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक निर्माण केलेल्या संविधान निर्मितीच्या कार्याला द्यावे लागते. कारण जगात कोठेही जे काही सर्वोत्तम असेल ते त्यांनी भारतीय संविधानात आणले. परंतु हे करीत असताना येथील स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्यायांशी निगडित प्रश्नांचा व

परिस्थितीचा मात्र मुळीच विसर पडू दिला नाही.

भारतीय संविधानकारांनी दूरदृष्टीचा विचार करुन स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय या मूल्यांचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत केल्याचे दिसून येते. भारतीय राज्यघटनेचे सार ही भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना असून यामध्ये व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता आणि सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायाच्या प्राप्तीची हमी देण्यात आलेली दिसून येते. म्हणून संविधानातील मूल्ल्यांविषयी आवर्जून लिहावेसे वाटते की,

"मनस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य,
नागरिकांना दिले संविधानाने,
देशबांधणीचा हा पाया,
लाभला समितीच्या सहकार्याने!"

शासन व्यवस्थेचे स्वरुप संविधानात निश्चित करण्यात आले असल्यामुळे या संदर्भात डॉ. पायली म्हणतात की, 'इतक्या निवडक शब्दांत इतके सुंदर विचार व श्रेष्ठतम आदर्श हे अपवादानेच आढळेल. एवढेच नव्हे तर भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा आपल्या घटनेच्या चौकटीत बसविण्यात आलेले एक मौल्यवान रत्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "ध्येयवादाचा मूर्तिमंत अविष्कार म्हणजे भारतीय संविधान होय." लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूलतत्त्वांच्या आधारावरच त्याची उभारणी झालेली आहे आणि रक्ताचा एकही थेंब न सांडता या देशात आमूलाग्र सामाजिक बदल घडवून आणणारी राज्यप्रणाली या संविधानातून आपण सुरु करीत असल्याचे बाबासाहेबांनी सांगितले होते. आंबेडकरांनी या पुढे असाही इशारा दिला होता की, "जगातील इतर संविधाने ही फक्त राजकीय, प्रशासकीय व आर्थिक चौकटी मुक्रर करतात. परंतु भारतीय संविधान हे मूलतः आज एक सामाजिक दस्तऐवज असून येथे येऊ घातलेल्या मन्वंतराची ती एक नांदी आहे. आपण राजकीय लोकशाहीचा प्रयोग सुरु केला आहे. पण आपले सामाजिक, आर्थिक जीवन मात्र विषमतापूर्ण आहे. अशा रितीने आपण अनेक अंतर्विरोधाच्या धुमाचक्रीत

पदार्पण करीत आहोत आणि हे अंतर्विरोध आपण मिटविले नाही तर आपला राजकीय लोकशाहीचा डोलारा कोसळून पडेल आणि स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय यासारखी मूल्ये ही ऱ्हास पावतील." या विधानावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील या मूल्याचे स्थान प्रतिपादीत करुन या मूल्यांभावी भारतीय लोकशाहीला निर्माण होणारा धोका स्पष्ट केला आहे.

"हक्काबरोबर जाणा स्वजबाबदारी,
करुन कायद्याचे पालन,
स्थैर्य, शांतता राष्ट्रा लाभण्या,
करा विधायक आचरण."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानातील आदर्श मूल्यांचा मनापासून अंगीकार करुया आणि प्रगत लोकशाही राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देऊया! शेवटी एवढेच लिहिन की,

"हमारे देश का संविधान है,
हमारी आन-बान और शान!"